ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

# सामना

ISO 9001:2000

वर्ष : २० अंक : २३९ ● मुंबई, शनिवार २० सप्टेंबर २००८ ● (पृष्ठे १२+४) ● मूल्य : २.५० रुपये ● www.saamana.com

संपादक : बाळ ठाकरे

# लालबागच्या राजाचे तेजोवलय

**लालबागच्या राजाला मनोभावे शरण जाणाऱ्या भक्तांचे मनोरथ पूर्ण होतात ही भक्तांची श्रद्धा. या श्रद्धेचे तेजोवलय त्याच्याभोवती असते. त्याविषयी जाणून घेऊ.**

**लालबागच्या** राजाला दिवसेंदिवस मिळत असलेली प्रसिद्धी, गर्दीचा नवा नवा विक्रम प्रस्थापित होणे यामागे निश्चितच एक प्रकारचे प्रचंड ऊर्जा स्रोत, चैतन्य काम करीत असणार हे नक्कीच. विश्वातील अदृश्य, अमाप विश्व चैतन्याचा उगम कुठला याबद्दल वेद काळापासून या क्षणापर्यंत अनेक ऋषी, महर्षी, सप्तर्षी, वैज्ञानिकांनी सखोल अभ्यास केला. या प्रदीर्घ चिंतन अभ्यासातून असे दिसले, विश्वातील एकूणएक वस्तुमान चैतन्यमयच आहे. दृश्य, अदृश्य, पंचतत्त्वे, पंचप्राणात्मक ऊर्जांच्या आविष्कारातून वस्तुमानाचे अस्तित्व कळते. अशाप्रकारे वस्तुमानाला स्वतःचे ऊर्जावलय/ तेजोवलय (ऑरा) असायलाच पाहिजे. अनेक वस्तुमानातूनच वास्तू निर्माण होतात म्हणजे या सर्व वास्तूचीही विशिष्ट तेजोवलये निर्माण होतात. त्यातलीच एक लालबागच्या राजाची वास्तू. इंद्रधनुष्यातील सप्तरंगीन तेजोवलय मानवी डोळ्यांनी दिसत असल्याने आपणास रंगवलयात्मक वास्तू दर्शनाची अनुभूती येते 'जा पा नी ही पि ना ता' इंद्रधनुष्यीय रंगवलयेही ठराविक कंपने स्फुरणांनी (Frequency) मोजतात. प्रत्येक सजीव, निर्जीव, चित्रांची रंगवलयीन तेजोवलये आय.एस.आय.एस. या उपकरणाच्या फोटोग्राफीने काढता येतात. तेजोवलय म्हणजे काय तर 'ऊर्जा' आणि ऊर्जा म्हणजे चैतन्यापर्यंत पोहोचणे. जेव्हा आपण वलये मोजतो तेव्हा त्यात (Charge Particle) भारावलेले कण मोजायचे असतात. वलय म्हणजे (Electro Magnetic Force) त्यात मिली ॲम्पीयर व्होल्टेज असते. (Electron) गतिमान झाले की विद्युतभार निर्माण होतो व ते मीटरने मोजू शकतो. त्याच्या रंगावरून व आकारमानानुसार ते तेजोवलय शुभ ऊर्जादायक किंवा अशुभ ऊर्जादायक हे ठरविता येते. त्या तेजोवलयाच्या



इंद्रधनुष्याच्या रंगावरून आपण त्यासंबंधित अचूक निदान करू शकतो. मी स्वतः ७ सप्टेंबर रोजी दुपारी २.३० वा. लालबागच्या राजाचे आय.एस.आय.एस. या फोटोग्राफिकने तेजोवलय काढले. लालबागच्या राजाच्या फोटोमध्ये सोनेरी, गुलाबी, हिरवा या रंगांची तेजोवलये दिसत आहेत. या फोटोमध्ये आपणास सोनेरी वलय म्हणजेच चैतन्यमय आध्यात्मिक शक्तीचे प्रतीक व भक्ती, शक्ती, प्रेम यांचा मिलाप तसेच गुलाबी रंगाचे वलय म्हणजेच प्रेमाचे व पवित्रतेचे प्रतीक, हिरव्या रंगाचे वलय हे शुभ व उच्च उर्जाचे प्रतीक आहे म्हणजेच या ठिकाणी प्रचंड प्रमाणात ओसंडून वाहणारे ऊर्जा स्रोत आहे. हे सिद्ध होते. दुसरा फोटो हा श्रींच्या चरणाचा आहे त्यामध्ये गुलाबी रंगाचे वलय दिसत आहे म्हणजेच भाविकांचे प्रेम या श्रींच्या चरणांजवळ ओसंडून वाहत आहे. म्हणूनच तेथे गुलाबी रंगाचे वलय आले आहे. हेच शुभ ऊर्जास्रोत लाखो लोकांना या ११ दिवसांत आकर्षित करून घेते, तसेच श्रींच्या मूर्तीजवळ असलेली वैश्विक ऊर्जा सर्व भाविकांना भारीत करते. त्यासाठीच या महागणपतीला साक्षात ॐकाराला तन्मयतेने शरण जाणे गरजेचे आहे. तेव्हा तुमचा नवस फळाला येईल. या राजाला आमचा साष्टांग नमस्कार असो.



■ तुषार यशवंत सावडावकर,
ज्योतिर्विद (ऑरा तज्ज्ञ),
लालबाग- ९८९२१५९७१५